महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८ /२०२४ दि. ०९/०२/२०२४

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी,** ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **कासारवडवली** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **हिरानंदानी इस्टेट, ठाणे** यांचे वतीने दि. ११/०२/२०२४ रोजी **'हाफ मॅरेथॉन'**चे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेमध्ये बहुसंख्य स्पर्धक भाग घेणार असून स्पर्धा पाहण्यासाठी मोठया प्रमाणात प्रेक्षकांची गर्दी होते. त्यामुळे स्पर्धेच्या कालावधीत सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**प्रवेश बंद —** १) ब्रम्हांड सिग्नल ते संत सेवालाल चौक मानपाडा पर्यंत दोन्ही बाजूस घोडबंदर ठाणे वाहिनी सर्व्हिस रोडवर जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** अ) ब्रम्हांड सिग्नल कडून मानपाडा, मनोरमानगर च्या दिशेने सर्व्हिस रोडने जाणारी वाहने ब्रम्हांड सिग्नल पासून मुख्य रस्त्याने मानपाडा ब्रिज संत सेवालाल चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.

ब) मानपाडा कडून ब्रम्हांड सिग्नल च्या दिशेने सर्व्हिस रोडने जाणारी वाहने मानपाडा ब्रिज, पातलीपाडा ब्रिज खालून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** २) मानपाडा कडून टिकुजीनीवाडी सर्कल कडे जाणा–या वाहिनीवरील सर्व प्रकारच्या वाहनांना **मानपाडा ब्रिज** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** टिकुजीनीवाडी सर्कल कडून मानपाडा कडे जाणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून मानपाडा कडून टिकुजीनीवाडी सर्कल कडे जाणारी वाहने सदर वाहिनीवरून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ३) टिकुजीनीवाडी सर्कल कडून खेवरा सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **टिकुजीनीवाडी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** खेवरा सर्कल कडून टिकुजीनीवाडी सर्कल च्या दिशेने येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून टिकुजीनीवाडी सर्कल कडून खेवरा सर्कल कडे जाणारी वाहने सदर वाहिनीवरून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ४) खेवरा सर्कल कडून डॉ. काशिनाथ घाणेकर सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **खेवरा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** डॉ. काशिनाथ घाणेकर चौक येथून खेवरा सर्कल कडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून खेवरा सर्कल कडून डॉ. काशिनाथ घाणेकर सर्कल च्या दिशेने जाणारी वाहने सदर वाहिनीवरून इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद —** ५) डॉ. काशिनाथ घाणेकर सर्कल कडून वसंत विहार सर्कल च्या दिशेने जाणाऱ्य सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. काशिनाथ घाणेकर सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग —** वसंत विहार सर्कल कडून डॉ. काशिनाथ घाणेकर सर्कल कडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून डॉ. काशिनाथ घाणेकर सर्कल कडून वसंत विहार सर्कल च्या दिशेने जाणारी वाहने सदर वाहिनीवरून इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. ११/०२/२०२४ रोजी सकाळी ०५:४५ ते १०:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी :–**

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, ठाणे.

नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.